यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेअंतर्गत मौजे राजूरा ता.दारव्हा व मौजे माणिकवाडा ता.नेर जि.यवतमाळ येथील प्रत्येकी एका वसाहत प्रकल्पास मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग,
शासन ज्ञापन शुध्दीपत्रक क्रमांक : यचव २०१७/ प्र.क्र.४९/ विजाभज-२
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार ,मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २८ फेब्रुवारी, २०१८

संदर्भ : शासनाचे समक्रमांकाचे दिनांक २१ फेब्रुवारी, २०१८ चे ज्ञापन.

ज्ञापन:-

यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेअंतर्गत विमुक्त जाती व भटक्या जमाती या समाजातील घटकांसाठी सन २०१७-१८ या वर्षात ग्रामपंचायत खोपडी अंतर्गत मौजे राजूरा ता.दारव्हा व ग्रामपंचायत माणिकवाडा ता.नेर जि.यवतमाळ येथील प्रत्येकी एका वसाहतीकरिता २० कुटुंबांसाठी घरे व अन्य बाबींसाठी प्रतिवसाहत रू.८८.६३ लक्ष इतक्या खर्चास संदर्भाधीन ज्ञापनान्वये त्यात नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

वरीलप्रमाणे प्रदान केलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना असे कळविण्याचे मला आदेश आहेत की, वरील दोन वसाहतीपैकी ग्रामपंचायत खोपडी अंतर्गत मौजे राजूरा ता.दारव्हा, जि.यवतमाळ येथील वसाहतीसाठी मंजुरी देण्याबाबत प्राप्त झालेल्या प्रस्तावात नमुद केलेला खर्च सदरहू प्रकरणी मान्यता दिलेल्या रु.८८.६३ लक्ष एवढ्या कमाल खर्चाच्या मर्यादेमध्येच खर्च करण्यात यावा. आवश्यकतेप्रमाणे यासाठीच्या प्रस्तावात अंतर्भूत बाबनिहाय खर्चाचे समायोजन करण्यात यावे आणि कार्योत्तर मान्यतेसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवावा.

सदर शासन ज्ञापन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०३०७१५३९०६०४२२ असा आहे. हे ज्ञापन डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhaurao Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=692454783803b1bf08be0ff2505a01eb578c61edfbb827457be5704f5b440067, serialNumber=950bc6a64b0801087d4b403d7351619557bcd3489ca14b4e0f644bf05a04e89c, cn=Bhaurao Raghunath Gavit
Date: 2018.03.07 15:41:43 +05'30'

(भा.र.गावित)
सह सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) /(लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) /(लेखा परीक्षा) महाराष्ट्र-२, नागपुर
३. जिल्हाधिकारी, यवतमाळ.
४. संचालक, विजाभज,इमाव व विमाप्र संचालनालय,पुणे
५. प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, अमरावती
६. सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, यवतमाळ
७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई
८. जिल्हा कोषागार अधिकारी, यवतमाळ
९. निवड नस्ती (विजाभज-२)